RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ७४ ] शुक्रवार, सप्टेंबर ४, २०२६/भाद्रपद १३, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ११५**

**प्राधिकृत प्रकाशन**

### उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र. ३, ठाणे यांजकडून

**अधिसूचना**

क्रमांक उजि(समन्वय)/टे-१/ऐरोली-काटई/कावि-१८०६/२०२६/१०९४, दिनांक ३१/०७/२०२६ व उजि(समन्वय)/टे-१/ऐरोली-काटई/कावि-२२५६/२०२६/१४१४, दिनांक २७/०८/२०२६.— ज्याअर्थी, उप जिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर ३, ठाणे, यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, **महाराष्ट्र शासन राजपत्रातील** अधिसूचना क्रमांक : उजि/भूसं/मेट्रो-३/ऐरोली-काटई रस्ता/२०२६, दिनांक २७ एप्रिल,२०२६ अन्वये, व उजि/भूसं/मेट्रो-३/ऐरोली-काटई रस्ता/२०२६, दिनांक २१ मे, २०२६ अधिसूचना काढली असून, त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची - एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची अनुसूची दोन मध्ये तपशिलवार वर्णन केलेल्या विस्तारित "ठाणे महानगरपालिका हद्दीतील नियोजित ४५ मी. ते ६५ मी. रुंद ऐरोली-काटई रस्ता" या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात आली आहे :

परंतु, उप अधीक्षक भूमी अभिलेख, ठाणे यांना सादर केलेली सुधारित संयुक्त मोजणी अहवालाच्या अनुषंगाने, मौजे शिळ, मधील काही सर्व्हे नंबर मधील क्षेत्र वगळण्यात आले आहे. तसेच शहर विकास व नियोजन अधिकारी, शहर विकास विभाग ठाणे, महानगरपालिका ठाणे यांचेकडील पत्र संदर्भ क्र./ठा.म.पा./मुख्या-१/शाविवि-२९/३२१०, दिनांक ३०/०७/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मौजे डावले व देसाई येथील काही सर्व्हे नंबरच हे ठाणे महानगरपालिका यांनी खरेदी केले आहे यामुळे सदर खरेदी केलेले सर्व्हे नंबर निवाड्यामधून कमी झाल्यामुळे सदर कमी झालेले क्षेत्र वगळण्यात येत आहे. "भूसंपादन व पुनर्वसन, पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३," च्या कलम ९३ (१) अन्वये समुचित सरकारला, ज्या भूमिचा कब्जा घेण्यात आलेला नाही अशा कोणत्याही भूमिच्या संपादनातून माघार घेण्याचे स्वातंत्र्य असेल. असे नमूद केले आहे. त्याअनुषंगाने संपादन संस्थेने वर नमूद केलेल्या सर्व्हे नंबर संपादित करण्याची आवश्यकता नाही असे कळविलेले सर्व्हे नंबर "ठाणे महानगरपालिका हद्दीतील नियोजित ४५ मी. ते ६५ मी. रुंद ऐरोली-काटई रस्ता" या प्रकल्पामधून वगळण्यात येत आहे.

## अनुसूची – एक

### वगळण्यात येत असलेल्या जमिनीचा तपशील

मौजे देसाई, मौजे डावले व मौजे शिळ, ता. जि. ठाणे

| अ. क्र. (१) | गावाचे नाव (२) | सर्व्हे नं. (३) | पोट स. नं. (४) | कलम १९(१) मधून वगळण्याचे क्षेत्र (डीनोटीफाईड) (५) |
|---|---|---|---|---|
| १ | देसाई | २२०/१ पै | २२०/१ पै | ०.०२८२ |
| २ | डावले | ५/५/ब | ५/५/ब | ०.१८९७ |
| ३ | डावले | १२२/३/क | १२२/३/क | ०.००८२ |
| ४ | शिळ | १७०/३क पै | १७०/३क पै | ०.००१५ |
| **एकूण** | | | | **०.२२७६** |

**वरुणकुमार सहारे,**
उप जिल्हाधिकारी (भूसंपादन),
मेट्रो सेंटर क्र. ३, ठाणे.

ठाणे,
दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.